Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-IX SEPTEMBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# महाविद्यालयीन ग्रंथालय आणि माहिती साक्षरता

**श्रीमती प्रतिभा भीमराव गायकवाड**
कार्यालय अधीक्षिका,
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर.

1) **प्रस्तावना :**

देशात जागरूक नागरिक निर्माण करण्यासाठी माहिती साक्षरता फार महत्त्वाची बाब आहे. सध्या ग्रंथालयाचे संगणकीकरण, आधुनिकीकरण होत आहे. विद्यार्थ्यांना इंटरनेटद्वारे Online व Offline सेवा दिल्या जात आहेत. तालिका पाहण्यासाठी OPAC ची व्यवस्था आहे; परंतु या सर्व सुविधा देत असताना जन वाचकांना संगणक हाताळता येत नसेल व संगणकावरील OPAC मधून त्यांना हव्या असलेल्या वाचनसाहित्याचा शोध घेता येत नसेल, तर ग्रंथालयांनी कितीही समृद्ध व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला असला तरी तो निरर्थक ठरतो. म्हणून या लेखामध्ये माहितीसाक्षरतेची गरज, उद्दिष्टे, घटक, तसेच माहिती साक्षरतेची संकल्पना स्पष्ट केली आहे.

माहिती साक्षरता हा एक समाजाचा अंगभूत घटक आहे. समाजाच्या प्रगतीला हातभार लावणारा घटक आहे. पूर्वी ज्याला वाचता-लिहिता येते त्याला साक्षर म्हणत; परंतु आता ज्याला लिहिता-वाचता येत असेल आणि त्याला संगणक हाताळता येत नसेल, तर ह्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वावरणाऱ्या त्या व्यक्तीस निरक्षर मानले जाते. आजच्या स्पर्धात्मक युगात माहितीचे महत्त्व व त्याची उपयुक्तता सर्वांनाच पटलेली आहे. सतत वाढणाऱ्या माहितीचा प्रभावी वापर करता यावा, यासाठी माहिती साक्षरता आवश्यक असते. माहिती साक्षरता हा शब्द माहिती आणि साक्षरता या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे.

अमेरिकेतील बॉयर कमिशनने पदवीपूर्व शिक्षणासंदर्भात केलेल्या संशोधनाअंती सादर केलेल्या अहवालात असे नमूद केले आहे की, विद्यार्थ्यास पुढे नमूद केलेल्या कामाच्या कार्याभ्यासाचे शिक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे.
संशोधनपर कामासाठी समस्याविधान तयार करणे व त्याबद्दलचा प्रश्नसंच तयार करणे.
त्यावर संशोधन करून स्वतःचे ज्ञान आणि माहिती निर्मितीक्षमता वापरून समस्यांवर उपाय सुचविणे.
संप्रेषण कौशल्य आत्मसात करणे.

माहिती साक्षरतेची विविध कौशल्ये आत्मसात करताना विद्यार्थ्यांना आपोआपच स्वयंनिर्देशित शिकण्याची संधी प्राप्त होते. ते जसजसे नवनवीन माहितीस्रोत वापरण्याच्या प्रक्रियेतून जातात, तसतशा त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावत जातात. माहितीयुक्त प्रश्न विचारण्यामुळे चिकित्सक विचार करण्याच्या प्रवृत्तीस धार येते, ज्यामुळे स्वयंनिर्देशित ज्ञान संपादण्यास त्यांना अधिक प्रोत्साहन मिळते.

2) **माहितीच्या व्याख्या-**

अ) New Webster Dictionary of the English Languages

"वस्तुस्थिती किंवा आकडेवारी वाचून किंवा इतर मार्गाने मिळविलेले ज्ञान म्हणजे माहिती होत."

ब) **UNISCO:**

चिन्हांकनयुक्त भाषेत विहित केलेले शास्त्रीय आणि तांत्रिक स्वरूपाचे ज्ञान म्हणजे माहिती होय.

3) **साक्षरता म्हणजे काय?**

अ) मातृभाषेमध्ये साक्षरता म्हणजे वाचता-लिहिता येणे व आकलन होणे म्हणजे साक्षरता होय.

ब) पाऊलो फ्रेरीरी या शिक्षणतज्ञाच्या मते- स्वतः प्रश्न, व्याप्ती आणि एकूण परिस्थिती समजून घेणे, त्याबद्दल जाणीव जागृती निर्माण होणे, म्हणजे साक्षरता होय.

क) जीवनातील प्रश्न सोडविण्याची नवीन-नवीन मानवी कौशल्ये करून स्वतः क्षमता वाढविणे म्हणजे साक्षरता होय.

4) **माहिती साक्षरतेची संकल्पना** :

माहिती साक्षरता म्हणजे माहितीची आवश्यकता समजणे, हवी ती माहिती मिळविणे, योग्यपणे व परिणामकारक रीतीने वापरणे किंवा मिळालेली माहिती स्वतःच्या ज्ञानात रूपांतर करून माहितीची परिणामकारकता जाणून घेणे, म्हणजे साक्षरता होय. सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जिथे माहितीच्या स्रोतांचा पूर आला आहे व जिथे ती आवश्यकतेपेक्षा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहे, अशा परिस्थितीत माहिती साक्षरतेचे महत्त्व वाढले आहे. माहिती साक्षरतेमुळे व्यक्ती पुढील गोष्टींत सक्षम होतो-

१. माहितीची आवश्यकता समजणे.
२. हवी ती माहिती मिळविणे व ती परिणामकारकपणे वापरणे.
३. माहिती तसेच माहितीच्या स्रोतांचे मूल्यमापन करता येणे.
४. मिळालेली माहिती स्वतःच्या कामात, ज्ञानात समाविष्ट करणे.
५. उपलब्ध झालेली माहिती विशिष्ट उद्देश सफल होण्यासाठी किंवा नवीन साधन निर्मितीत योग्यपणे वापरणे.

5) **माहितीसाक्षरतेचे घटक** : Norman Higham यांनी सुचविल्याप्रमाणे माहितीसाक्षरतेचे तीन घटक महत्त्वाचे आहेत.

- ग्रंथालयाचा सामान्य उपयोग करण्यासाठी मदत करणे.
- माहिती साधनांच्या उपयोगाबाबत वाचकांना मार्गदर्शन करणे.
- वाचकांना आवश्यक त्या विषयावरील माहितीचा शोध घेण्यासाठी विशेष मदत करणे.

**डॉ. एस. आर. रंगनाथन-** माहिती साक्षरतेच्या दृष्टिकोनातून वाचकांचे, उपभोक्त्यांचे पाच प्रकार नमूद केलेले आहेत.

१. नवागत वाचक (Fresh User/ Reader)
२. सामान्य वाचक (General User/ Reader)
३. सहज येणारा वाचक (Casual/ Reader)
४. अनुपस्थित वाचक (Absent Reader)
५. तज्ज्ञ वाचक (Specialist Equirer/ Reader)

माहिती साक्षरतेची जाणीव होणे म्हणजे माहितीच्या गरजेची जाणीव निर्माण होणे, त्याअनुषंगाने वेगवेगळ्या साधनांद्वारे वेगवेगळ्या स्वरूपात माहितीचा शोध घेणे व त्या माहितीचा उपयोग करणे.

6) **माहितीसाक्षरतेची गरज** : ग्रंथालयात माहिती साक्षरतेची गरज फार मोठ्या प्रमाणात आहे.

विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, डॉक्टर, व्यवस्थापकीय क्षेत्रात कार्य करणारी व्यक्ती, व्यावसायिक व इतरही व्यक्तींना त्यांच्या क्षेत्रांत कार्य करीत असताना अनेक कारणांकरीता विविध विषयांवर होणाऱ्या नवीन घडामोडी माहीत करून घेण्याकरीता तसेच विषय शिकविण्याकरीता तर संशोधकांना त्यांच्या संशोधनक्षेत्रातील नव्या संशोधनांची अद्ययावत माहिती मिळवावी लागत असते.

१. वेगवेगळ्या स्वरूपाची माहिती विखुरल्यामुळे माहिती साक्षरतेची अत्यंत गरज आहे.
२. आपल्या क्षेत्रात पाऊल पुढे टाकत असताना त्याला त्या क्षेत्रातील नवीन ज्ञान अवगत करावे लागत असते. त्यासाठी माहिती साक्षरता आवश्यक आहे.
३. निर्माण होणाऱ्या प्रश्नाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी माहिती साक्षरतेची गरज असते.

४. एखाद्या व्यक्तीला माहिती मिळालीच पाहिजे, अशी परिस्थिती असते तेव्हा ती गरज असते.
५. अमेरिकेत १९८० पासून माहिती साक्षरता विषयाचा शैक्षणिक स्तरावर अभ्यास करण्यात येतो.

**माहिती साक्षरता राबविण्याची पद्धती :**

१. वाचकांचा गट पाडून अनेक ग्रंथालयांतून प्रत्यक्ष फिरवून सेवांची व पुस्तकांची माहिती करून देणे.
२. ग्रंथालयाची परिचयपुस्तिका प्रकाशित व वितरित करणे (Know your Library/ Library Guide)
३. दृक-श्राव्य माध्यमाच्या सहाय्याने ग्रंथालयासंबंधी माहिती देणारी ध्वनिफीत, चित्रफीत, स्लाईड्स, ट्रान्सपरन्सीज् इत्यादी तयार करणे.
४. प्रत्येक वर्गावर काही विशिष्ट तासिका घेऊन विद्यार्थ्यांना जाणीव करून देणे.

**कार्यक्रम कोणी राबवावा?**

महाविद्यालयात माहिती साक्षरता कार्यक्रम सामान्यपणे ग्रंथपालांनीच राबविला पाहिजे; कारण इतर विद्याशाखांतील शिक्षकांपेक्षा ग्रंथपाल हाच परिणामकारक शिक्षक ठरू शकतो. विद्यापीठ अनुदान आयोग, वेगवेगळे शिक्षण आयोग यांनी महाविद्यालयीन ग्रंथपालाला शिक्षक म्हणून संबोधले आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार महाविद्यालय ग्रंथपालाला शिक्षकांच्या व्याख्येत समाविष्ट केले आहे. ग्रंथपालाच्या कर्तव्याचा तो एक महत्त्वाचा शैक्षणिक भाग म्हणून मान्य करण्यात आला आहे आणि ते ग्रंथालय क्षेत्रातील तज्ज्ञ असल्यामुळे त्यांच्याद्वारेच माहिती साक्षरता कार्यक्रम राबविला जावा.

7) **माहिती साक्षरता कार्यक्रमाची उद्दिष्टे :** माहिती साक्षरता ही आयुष्यभर शिक्षण यावर आधाारित आहे. उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थ्यांना प्राप्त माहितीचा उपयोग त्यांच्या दैनंदिन जीवनात करता येणे.
२. प्राप्त झालेल्या माहितीचा योग्य व प्रभावीपणे वापर करता येणे.
३. विद्यार्थ्यांना केंद्र मानून माहितीच्या शोधात मदत करणे.

8) **महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरतेच्या आवश्यकतेची कारणे :**

ग्रंथालयात माहिती साक्षरतेची आधुनिक संकल्पना म्हणून उदयास आली आहे. कारण आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे व यामुळे माहिती ही प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे. त्यामुळे वाचकांना जलद सेवा देण्यासाठी ग्रंथालयात माहिती साक्षरता राबविण्यात येण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत-

१. माहितीचा परिस्फोट
२. माहिती साधनांमधील वाचकांची अनभिज्ञता
३. शिक्षणक्षेत्रात झालेली वाढ
४. कमीत कमी वेळेत नवीन संशोधनाचा उपयोग
५. ग्रंथालयातील नवीन माहिती तंत्रज्ञानाचा वाढता वापर

9) **फायदे :**

प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरता योजनाची व्यवस्थित अंमलबजावणी झाल्यास त्यापासून भविष्यात होणारी निष्पत्ती निश्चित असेल.

जागतिकीकरणामुळे विदेशी विद्यापीठे भारतात आपले बस्तान मांडण्यास उत्सुक आहेत. या विदेशी शिक्षणसंस्थांशी यशस्वी स्पर्धा करण्यासाठी आपण घडवित असलेला विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे.

१. ग्रंथालयाशी अभ्यासकांचा सतत संपर्क राहणार असल्यामुळे त्यांच्यामध्ये वाचनसंस्कृती विकसित होण्यास मदत होते.
२. शिक्षण जास्तीत जास्त ग्रंथालयभिमुख होण्यास मदत होते.
३. स्वतःची माहितीच्या संदर्भातील गरज ओळखून त्यास आपले उद्दिष्टे गाठण्यास परिणामकारक उपयोग करण्याची क्षमता वाचकांमध्ये विकसित होते.
४. उच्च शिक्षणातील संशोधानात ग्रंथालयाचा अधिक उपयोग होतो. त्यामुळे संशोधनाचा दर्जा उंचावण्यात मदत होते.
५. महाविद्यालयीन ग्रंथालयाचा उपयोग वाढेल व ग्रंथपालांना आपण ग्रंथालयाद्वारे वाचकांना उपयुक्त सेवा देत असल्याचे समाधान लाभेल.

10) **सारांश :**

माहिती साक्षरतेची क्षमता ही विद्यार्थ्यांस सर्वसामान्य क्लासरूमच्या चौकटीच्या पुढे नेऊन व्यावसायिक करिअरमध्ये पदार्पण करताना स्वतः निर्देशित संशोधन कसे करावे, आवश्यक ते ज्ञान स्वतः कसे प्राप्त करावे व आयुष्याच्या सर्व स्तरावर जबाबदारीने व यशस्वीपणे कसे कार्य करावे, याचे तंत्र शिकवते. कारण माहिती साक्षरता ही विद्यार्थ्यास माहितीचे मूल्यमापन करणे, तिचे व्यवस्थापन करणे, तसेच ती योग्य प्रकारे वापरणे यासाठी सक्षम करते. महाविद्यालयीन शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यास हे तंत्र/ क्षमता आत्मसात व्हावी, शिक्षणातील आवश्यक असा मूल्यमापनाचा दर्जा प्राप्त व्हावा, यासाठी माहिती साक्षरतेचे शैक्षणिक कार्यक्रम राबविताना ग्रंथपाल समूहास भागीदार म्हणून महत्त्व देण्यात आले आहे, हे विशेषत्त्वाने सांगावे लागेल. याव्यतिरिक्त आज माहिती तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक संस्था करू लागल्यामुळे माहिती साक्षर नागरिक बनविण्याची पूर्वी कधी न लक्षात आलेली जबाबदारीही शैक्षणिक ग्रंथपालांनाच पार पाडावी लागणार, हे स्पष्ट दिसत आहे.

**संदर्भ सूचीः**

१. खेरडे मोहन २००६, महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरता, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र घटना घडामोडी. ज्ञानगंगोत्री, जून-जुलै २००६.
२. बाहेती एस. आर. २००६, महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये माहिती साक्षरता कार्यक्रम, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र घटना घडामोडी. ज्ञानगंगोत्री, जून-जुलै २००६.
३. वरखेडे रमेश, २००६, ज्ञानगंगोत्री यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
४. वीर धर्मराज, २००७, ग्रंथपरिवार वेदांत आचार्य नगर, वसमत रोड, परभणी.
५. फडके द. ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.